**ठळक बातम्या**

- दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत; अरविंद केजरीवाल, मनिष सिसोदिया यांच्यासह आपच्या दिग्गज नेत्यांचा पराभव
- दिल्लीत विकास, व्हिजन आणि विश्वासाचा विजय झाला असं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून समाधान व्यक्त
- नवीन प्राप्तिकर विधेयक पुढच्या आठवड्यात संसदेत सादर होणार

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमधे महाराष्ट्राची २५ सुवर्ण पदकांसह एकूण ११२ पदकांची कमाई

<><><><><>

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांपैकी भाजपानं सर्वाधिक जागा जिंकत निर्विवाद बहुमत मिळवलं आहे. भाजपाला ४८ जागा मिळाल्या असून सत्तारूढ आम आदमी पार्टीला केवळ २२ जागांवर समाधान मानावं लागलं आहे. दिल्लीत तब्बल २७ वर्षांनी भाजपाची सत्ता येणार आहे. नवी दिल्लीतून अरविंद केजरीवाल, जंगपुरातून मनीष सिसोदिया आणि ग्रेटर कैलाशमधून सौरभ भारद्वाज हे आपचे ज्येष्ठ नेते तर पूर्व दिल्लीतून काँग्रेसचे संदीप दीक्षित पराभूत झाले आहेत. कालकाजी मतदारसंघातून आपच्या आतिशी विजयी झाल्या आहेत. दरम्यान, भाजपाचे पक्षश्रेष्ठी पुढचा मुख्यमंत्री ठरवतील, असं केजरीवाल यांचा पराभव केल्यानंतर प्रतिक्रिया देताना परवेश वर्मा यांनी म्हटलं आहे.

अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

## होल्ड- व्हाईस कास्ट

*भाजपाचे परवेश वर्मा नवी दिल्लीतून, जंगपुरातून तरविंदर सिंग, करवाल नगरातून कपिल मिश्रा, राजौरी गार्डनमधून मनजिंदर सिंग सिरसा, गांधीनगरमधून अरविंदर सिंग लव्हली, ग्रेटर कैलाशमधून शिखा रा◌ॅय आणि मोती नगरातून हरिश खुराना हे विजयी झालेले प्रमुख नेते आहेत. तर आपचे विजयी झालेले महत्त्वाचे उमेदवार असे - सदर बाजारातून सोम दत्त, बाबरपूरमधून गोपाल राय, दिल्ली कॅन्टोन्मेंटमधून विरेंदर सिंग कादिअन, कोंडलीतून कुलदीप कुमार, टिळक नगरातून जर्नेल सिंग विजयी झाले आहेत. खोट्या आश्वासनांनी जनतेची दिशाभूल करता येत नाही अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री* ***नरेंद्र मोदी यां****नी दिली आहे. उत्तम प्रशासन आणि विकासामुळे भाजपा विजयी झाला असून जनशक्ती सर्वश्रेष्ठ असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीला जनतेची सेवा करणारं सरकार मिळाल्याचं केंद्रीय अर्थमंत्री* ***निर्मला सीतारामन*** *यांनी म्हटलं आहे. दिल्लीच्या जनतेनं भाजपावर विश्वास ठेवल्याचं सिद्ध झालं असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात दिल्लीचा संपूर्ण कायापालट होईल असं केंद्रीय मंत्री* ***नितीन गडकरी*** *यांनी म्हटलं आहे.*

*लोककल्याणकारी योजनांमुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेचा विश्वास जिंकला, असं केंद्रीय मंत्री* ***पियूष गोयल*** *यांनी आज मुंबईत सांगितलं. मतदारांनी दिलेल्या जनादेशाचा पूर्ण आदरानं स्वीकार करत असल्याची प्रतिक्रिया आपचे प्रमुख* ***अरविंद केजरीवाल*** *यांनी दिली आहे. आप यापुढे जबाबदार विरोधी पक्ष म्हणून दिल्लीतील जनतेच्या सेवेत असेल, असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांच्या दूरदृष्टीतून भाजपा सरकार दिल्लीचा विकास करेल असं नवी दिल्लीतले भाजपा उमेदवार* ***परवेश वर्मा*** *यांनी सांगितलं. आपचे* ***मनीष सिसोदिया*** *यांनी पराभव मान्य केला आहे. तर काँग्रेस आत्मपरीक्षण करेल असं काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या* ***प्रियंका*** *गांधी यांनी पक्षाच्या दारूण पराभवाबद्दल म्हटलं आहे. दिल्लीच्या जनतेने अरविंद केजरीवाल यांचा भ्रष्टाचार उघड केला असून जनतेने भाजपावर दाखवलेला विश्वास वाया जाणार नाही असं मुख्यमंत्री* ***देवेंद्र फडणवीस*** *यांनी म्हटलं आहे. केंद्र आणि दिल्ली विधानसभेतही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विचारांचे डबल इंजिन सरकार आल्याने दिल्लीच्या सर्वांगीण विकासाला दुप्पट गती मिळेल, असं उपमुख्यमंत्री* ***अजित पवार*** *यांनी संदेशात सांगितलं.*

**<><><><><>**

दिल्लीत आज विकास, व्हिजन आणि विश्वासाचा विजय झाला असून ढोंग, अराजकता आणि संकटाचा पराभव झाला आहे, अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या विजयाबद्दल समाधान व्यक्त केलं. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. भाजपा

कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळेच हे शक्य झालं असून त्यासाठी त्यांचं अभिनंदन करतो, असंही मोदी म्हणाले.

या निवडणुकीवेळी आपण प्रत्येक दिल्लीकराच्या नावे पत्र लिहून विनंती केली होती की दिल्लीला विकसित भारताची विकसित राजधानी बनवण्यासाठी संधी द्यावी. या संधीसाठी आपण दिल्लीकरांचे आभार मानतो, असं प्रधानमंत्री म्हणाले. दिल्लीकरांच्या प्रेमाची परतफेड विकासरूपाने करू, असं आश्वासनही मोदी यांनी यावेळी दिलं.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीचा विजय भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते देशभरात साजरा करत आहेत. दिल्लीतल्या भाजपा कार्यालयात कार्यकर्त्यांनी फटाके वाजवून आणि मिठाई वाटून आनंद व्यक्त केला. **नागपूर**च्या भाजप कार्यालयाबाहेर ढोलताशे वाजवून जल्लोष करण्यात आला. **कोल्हापूर**मधे भाजपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर पेढे वाटून आनंदोत्सव साजरा झाला. तर **धुळ्यात** भाजपाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विजय साजरा केला.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या मिल्कीपूर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपाचे चंद्रभानु पासवान विजयी झाले आहेत. तमिळनाडूतल्या पूर्व एरोड इथल्या पोटनिवडणुकीत द्रमुकचे चंदिराकुमार व्ही सी यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यावर मोठ्या मताधिक्यानं विजय मिळवला आहे.

**<><><><><>**

येत्या आठवड्यात संसदेत नवीन प्राप्तिकर विधेयक आणलं जाईल, त्यानंतर ते संसदीय स्थायी समितीकडे पाठवलं जाईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सांगितलं. दिल्ली इथं रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्यासोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. आर्थिक विकासाकरता आणि महागाईच्या आव्हानाला सामोरं जाण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक एकत्र मिळून काम करत आहेत, असं सीतारामन यांनी सांगितलं. महागाई असो किंवा विकासाचा मुद्दा असो चलनविषयक धोरण आणि वित्तीय धोरण समन्वयाने आखलं पाहिजे, तरच जनतेला त्याचा लाभ होईल, असंही त्या म्हणाल्या.

जागतिक बाजाराच्या हालचालीवरून रुपयाची किंमत ठरते, रुपयाच्या दैनंदिन मूल्याबद्दल रिझर्व्ह बँकेला चिंता नाही, असं गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांसोबतची धोरणात्मक, आर्थिक आणि तंत्रज्ञानविषयक भागीदारी आणखी बळकट करणं यावर त्यांच्या या दौऱ्यात मुख्य भर असणार आहे. राजनैतिकदृष्ट्या हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉ यांच्या आमंत्रणावरून प्रधानमंत्री १० ते १२ फेब्रुवारी दरम्यान फ्रान्सला भेट देणार आहेत. पॅरिसमध्ये आयोजित

एआय कृती शिखर परिषदेचं सह-अध्यक्ष पद ते भूषवतील. या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या व्यवस्थापनाचं भविष्य या विषयावर विविध राष्ट्रांचे नेते चर्चा करणार आहेत. एआयचा मूल्याधिष्ठित विकास, उपलब्धता, आणि नवोन्मेष अशा अन्य पैलूंवरही या परिषदेत चर्चा होणार आहे. मोदींच्या या दौऱ्यात ते फ्रान्सच्या नेतृत्वाशी संरक्षण, व्यापार, ऊर्जा सहकार्य इत्यादी मुद्द्यांवर तसंच द्विपक्षीय संबंध आणखी दृढ करण्यासंदर्भात चर्चा करतील. तसंच मार्सेली इथं सुरू होत असलेल्या भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाच्या उद्घाटन समारंभालाही ते हजेरी लावणार आहेत.

फ्रान्सची भेट आटोपून १२ फेब्रुवारीला प्रधानमंत्री अमेरिकेला रवाना होतील. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर काही आठवड्यातच प्रधानमंत्री या देशाला भेट देत असल्यानं, त्यांचा अमेरिका दौराही फ्रान्सइतकाच महत्त्वाचा मानला जात आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक ११२ पदकं जिंकली असून त्यात २५ सुवर्ण, ४१ रौप्य आणि ४६ कांस्य पदकांचा समावेश आहे. सध्या महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असून ४१ सुवर्ण पदकांसह सेना दलं पहिल्या तर ३० सुवर्ण पदकांसह कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे. १० हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत आज महिला गटात महाराष्ट्राच्या संजीवनी जाधव हिने सुवर्णपदक पटकावलं असून पुरुषगटात किरण माने याने रौप्य पदक पटकावलं आहे.

**<><><><><>**

ओदिशाच्या झारसुगुडा जिल्ह्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या कथित देशविरोधी वक्तव्याबद्दल त्यांच्याविरोधात एफआयआर दाखल केल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यानं दिली आहे. भाजप युवा मोर्चा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, बजरंग दल या संघटनांनी केलेल्या तक्रारीवरून हा अहवाल दाखल केल्याचं या अधिकाऱ्यानं सांगितलं.

**<><><><><>**

नीट-युजी वैद्यकीय प्रवेश परीक्षा येत्या ४ मे रोजी घेण्यात येणार असल्याचं एन टी ए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं म्हटलं आहे.  या परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया कालपासून सुरु झाली असून ती ७ मार्चपर्यंत चालणार आहे. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठी एन टी ए दरवर्षी या परीक्षेचं आयोजन करत असून एम बी बी एस बरोबरच दंतवैद्यकीय, आयुर्वेद, युनानी आणि सिद्ध या इतर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीही या परीक्षेचा निकाल गृहीत धरला जातो.

**<><><><><>**

ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ सावंत यांच्या पार्थिवावर आज दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. आज पहाटे मुंबईत त्यांचं राहत्या घरी निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी सावंत यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**//<><><><><>//**